अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | मंगळवार
०३.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २७४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

सांगली जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर

गोपीचंद पडळकरांनी विजयाचा गुलाल उधळला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



सांगली – सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या मतमोजणीत जत सोसायटी गटातून आमदार गोपीचंद पडळकर यांनी विजय मिळवला आहे. मिरजेतील मार्केट यार्ड परिसरात जिल्हा बँकेच्या निवडणुकीची मतमोजणी सुरू होती.

आठ टेबलवर २५ कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही प्रक्रिया पार पडली. बँकेच्या एकूण जागांपैकी १५ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरित सहा जागांसाठी १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

गोपीचंद पडळकरांचा जत सोसायटी गटातून विजय जत सोसायटी गटातील निवडणुकीत आमदार गोपीचंद पडळकर यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार विनोद पवार यांच्यावर मात केली. पडळकर यांना ५४ मते, तर विनोद पवार यांना ३४ मते मिळाली. अशा प्रकारे पडळकर यांनी २० मतांच्या फरकाने विजय मिळवला.

पडळकर यांच्या विजयाची माहिती समोर येताच समर्थकांनी मतमोजणी केंद्राबाहेर जल्लोष सुरू केला. मिरज मिशन चौकात जेसीबीच्या माध्यमातून गुलालाची उधळण, डॉल्बीचा दणदणाट आणि क्रेनच्या साहाय्याने भव्य हार घालण्याची तयारी करण्यात आली आहे. . जिल्हा बँकमध्ये गोपीचंद पडळकर यांची आता दणदणीत एन्ट्री झाली आहे. मोठ्या मताधिक्क्याने पडळकर निवडून आले.

पडळकरांनी विजयाचा गुलाल उधळलाच गोपीचंद पडळकर विरुद्ध महाविकास आघाडीचे विनोद पवार यांच्यात लढत होती. अखेर पडळकरांनी या निवडणुकीत बाजी मारली. पडळकरांच्या विजयानंतर मतमोजणी केंद्रावर त्यांच्या समर्थकांचा जल्लोष बघायला मिळत आहे. गुलाल उधळून हा जल्लोष केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ही निवडणूक चर्चेत होती.

आधी देवेंद्रजी मुख्यमंत्री, मग मी झालो, देवेंद्रजी पुन्हा आले ; आम्ही पुण्यात विकासाची गंगा वाहत ठेवली, अजिदादांचाही सिंहाचा वाटा : एकनाथ शिंदे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



पुणे – पुण्यातील हिंजवडी शिवाजीनगर मेट्रो तीन मार्गिकेचे उद्घाटन आज (३ नोव्हेंबरला) पार पडलं आहे, तर उद्या (४नोव्हेंबर) पासून मेट्रो धावणार आहे. पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत एक महत्वाचा टप्पा ठरणाऱ्या पुणे मेट्रो लाईन ३ माण-हिंजवडी ते शिवाजीनगर 'पुणेरी मेट्रो' (पिंक लाईन) ४ नोव्हेंबरपासून प्रवाशांच्या सेवेत दाखल होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने उद्घाटन करण्यात आलं आहे, तर या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, एकनाथ शिंदे, खासदार आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटलांसह अन्य आमदार, खासदार नेते पुण्यात उपस्थित आहेत. या कार्यक्रमावेळी नेत्यांनी दिवंगत अजित पवारांच्या आठवणींना देखील उजाळा दिला.

तर मेट्रो उद्घाटनप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बोलताना म्हटलं की, ज्या मेट्रोचं भूमिपूजन केलं, त्या मेट्रोचं लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते होतंय. हा एक ऐतिहासिक दिवस आहे. टाटा आणि सिमेंसने हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महत्वाचं योगदान दिलं. हिंजवडी परिसर देशातील आयटी इंडस्ट्रीतील महत्वाचा भाग आहे. लाखो कामगारवर्ग इथे रोज ये-जा करतात. ते आतुरतेने याची वाट पाहत होते. आज ती पिंक पॉवर लाईन सेवेत दाखल होतेय. आता १०० किलोमीटर मार्गावर मेट्रो धावणार आहे. महाराष्ट्रात आजच्या दिवशी बारा महानगरांमध्ये मेट्रो प्रकल्प सुरुये. पंतप्रधानांनी आम्हाला हा विकास दिलाय. तुमचे आभार. इथली मोबिलिटी पाहता फ्रंटलाईन इन्फ्रा म्हणून पुण्याकडे पहिलं जाईल. इथं वेगवेगळे विक्रम होतील, आज केवळ पुणे मेट्रो फेज ३ चे लोकार्पण होत नाहीये. तर पुणे मेट्रो फेज २ विस्तारीकरणाचे भूमिपूजन होत आहे. यानंतर आम्ही प्रस्तावित आंतर राष्ट्रीय विमानतळापर्यंत मेट्रो पोहचवू. मी, एकनाथ शिंदे आणि आज अजित दादांचं नाव घेण्याची गरज आहे. सुनेत्रा वाहिनींचंही यामध्ये योगदान आहे, असंही पुढे फडणवीसांनी म्हटलं.

थोडक्यात

पंतप्रधान मोदींच्या हस्ते हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोचे टन : उद्यापासून प्रवाशांच्या सेवेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

पुणे – पुणे शहरातील वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी आणि प्रवास अधिक जलद बनवण्यासाठी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून पुणे मेट्रोशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विकासकामांचे उद्घाटन केले, तसेच काही नवीन मार्गांच्या कामाची पायाभरणी केली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती होती. या नव्या मेट्रो प्रकल्पांमुळे पुण्याच्या कानाकोपऱ्यात जाणे सहज शक्य होणार असून, रस्त्यांवरील गाड्यांचा ताण आणि ट्रॅफिक कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामस्थळी अपघात : खुले कारागृहातील कर्मचाऱ्याचा मृत्यू

एमपीएससीतून मोठ्या पदावर जाण्याचे स्वप्न अधुरे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





मोर्शी – खेड फाटा ते रेल्वे गेट क्रमांक २७ दरम्यान सुरू असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामस्थळाजवळ झालेल्या अपघातात अमोल आनंदराव फुलाते (वय २७ वर्षे) यांचा मृत्यू झाला. ते मोर्शी येथील खुले कारागृहात पोस्ट फार्मासिस्ट म्हणून कार्यरत होते. मूळचे नांदेड-परभणी जिल्ह्यातील असल्याचे समजते.

अमोल फुलाते हे २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत कर्तव्यावर हजर होते. त्यानंतर ते मित्रासोबत दुचाकीने चिखलदरा येथे फिरण्यासाठी गेले होते. परत येताना झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. मनमिळावू व हुशार असलेले अमोल यांनी यापूर्वी तीन सरकारी नोकऱ्या सोडल्या होत्या. सध्या नोकरी सांभाळून ते एमपीएससीचा अभ्यास करीत होते. मोठ्या पदावर जाण्याचे त्यांचे स्वप्न मात्र नियतीच्या आघाताने अधुरे राहिले.

दरम्यान, अपघातापूर्वी बांधकामस्थळी बॅरिकेटिंग व पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याचा आरोप परिसरातील वाहनचालक आणि शेतकऱ्यांनी केला आहे. अपघातानंतर कंपनीने बॅरिकेटिंग लावून सुरक्षारक्षकांना सतर्क केल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यापूर्वी रिद्धपूरजवळही उड्डाणपुलाच्या बांधकामस्थळी अपघातात एका वाहनचालकाचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात येत आहे. बांधकामस्थळी सुरक्षा व्यवस्थेचा अभाव असल्याच्या तक्रारींची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून बांधकामस्थळांवरील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

निवडणूक अर्ज बाद झाल्याने आमदार पुत्राकडून अधिकाऱ्याच्या दालनावर लाथा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज बाद झाल्याने शिवसेनेचे आमदार किशोर पाटील यांचे पुत्र सुमित पाटील यांनी संताप व्यक्त केला.

अर्ज बाद करण्याच्या निर्णयाविरोधात त्यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या दालनाच्या दरवाजाला लाथा मारत नाराजी व्यक्त केली. राजकीय दबावातून आणि काही अदृश्य शक्तींच्या हस्तक्षेपामुळे आपला अर्ज बाद करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकारामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील वातावरण तापले आहे. जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सुमित पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या अर्जावर भाजपचे सतीश शिंदे यांनी हरकत घेतली होती. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अर्ज बाद करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय समजल्यानंतर सुमित पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

विहिरीतील मोटरपंपचे साहित्य चोरीला

७ हजार २०० रुपयांचे नुकसान : भांडोली शेतशिवारातील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – शेतातील विहिरीतून मोटरपंपला जोडलेला पाईप व केबल चोरीला गेल्याची घटना भांडोली शेतशिवारात उघडकीस आली आहे. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञाताविरुध्द चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी शेख अकबर शेख रजाक हे त्यांच्या शेतात झाडांना पाणी देण्यासाठी गेले असता त्यांनी पाण्याची मोटार सुरु केली. मात्र, पाईपमधून पाणी येत नसल्याने त्यांनी विहिरीत डोकावुन पाहिले. यावेळी विहिरीतील मोटरपंपला जोडलेला पाईप व केबलचा दोर असा एकूण ७ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल तुटलेल्या अवस्थेत आढळून आला. अज्ञात चोरट्याने विहिरीतील सदर साहित्य चोरुन नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

याप्रकरणी फिर्यादी यांच्या जबानी रिपोर्टवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.



बोरवेलचे अनाधिकृत खोदकाम केल्यास थेट गुन्हा दाखल होणार : बीड जिल्हा प्रशासनाचा मोठा निर्णय : जिल्ह्यात बोरवेल खोदकामावर निर्बंध

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



बीड – जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा अत्यंत कमी पर्जन्यमान झाले असून जिल्ह्याला तीव्र दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे आहे. जून ते सप्टेंबर या मुख्य मान्सून हंगामात जिल्ह्यात पावसाची मोठी तूट नोंदवली गेली आहे. परिणामी भूजल पाणी पातळीत ४.५ मीटर इतकी मोठी घट झाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने एक मोठा निर्णय घेतला असून बोरवेल खोदण्यासाठी आता निर्बंध घालण्यात आले आहेत.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यात आता बोरवेल घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांची पूर्व लेखी परवानगी घेणे बंधनकारक असेल. तहसील कार्यालयामार्फत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा लागणार आहे. तर ६० मीटर पेक्षा म्हणजे २०० फुटापेक्षा अधिक खोल बोरवेल घेण्यास परवानगी दिली जाणार नाहीये. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्तोत्रापासून ५०० मीटरच्या आत पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी बोरवेल खोदकामास परवानगी दिली जाणार नाही. तर सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी आवश्यक असलेल्या कूप नलिका प्रस्तावांना सात दिवसाच्या आत निर्णय द्यावा लागणार आहे. अशी देखील माहिती आहे. बोरवेलचे अनाधिकृत खोदकाम आढळल्यास स्थानिक प्रशासनाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दरम्यान, बोरवेलचे अनाधिकृत खोदकाम आढळल्यास स्थानिक प्रशासनाने गुन्हा दाखल करण्याचे आदेशात म्हटले आहे. हे आदेश पुढील वर्षी ३० जून २०२७ पर्यंत लागू असणार आहेत.

न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे

ग्रामविकासाचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंतांना अभिवादन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





वरुड – येथील न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ५८ वी पुण्यतिथी विविध उपक्रमांनी श्रद्धापूर्वक साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रसंतांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या प्राचार्य माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, प्री-प्रायमरी विभागप्रमुख पराग भोंडे तसेच पीआरओ किशोर देशमुख यांनी राष्ट्रसंतांच्या प्रतिमेचे पूजन केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महान संत, समाजसुधारक आणि राष्ट्रभक्त होते. खंजिरी भजनांच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे महान कार्य केले. ग्रामस्वच्छता, शिक्षण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश त्यांनी आपल्या विचारांतून व कार्यातून जनसामान्यांपर्यंत पोहोचविला.

या प्रसंगी शाळेतील शिक्षिका उज्वला बहुरुपी यांनी राष्ट्रसंतांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

त्यानंतर सामुदायिक प्रार्थना, ध्यान आणि मौन प्रार्थना घेण्यात आली. यामध्ये शाळेतील सर्व मान्यवर व शिक्षकांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची सुंदर भजने सादर करुन वातावरण भक्तिमय केले. संगीत शिक्षक विश्वनाथ दिवाण आणि सुमित नागपुरे यांनीही सुरेल गीतगायन केले.

या कार्यक्रमाला संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर आदी मान्यवरांचे मार्गदर्शन व प्रेरणा लाभली.

शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त बेनोडा येथे

न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूलची भव्य एकता रॅली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – भारताचे लोहपुरुष आणि अखंड भारताचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल आणि पोलीस स्टेशन बेनोडा शहीद यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले.

शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित ही रॅली बेनोडा पोलीस स्टेशन येथून सुरु होऊन गावातील प्रमुख मार्गांवरुन मार्गक्रमण करत शाळेपर्यंत पोहोचली. या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, सामाजिक सलोखा आणि देशप्रेमाचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विविध घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. उत्स्फूर्त सहभागातून विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता आणि अखंडतेची भावना जागृत करण्याचा प्रयत्न केला.

या कार्यक्रमात ठाणेदार विवेक देशमुख व पोलीस कर्मचारी, मुख्याध्यापक हर्षल झोड, एचओडी अश्विनी श्रीराव, शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

यावेळी सहाय्यक शिक्षिका दीक्षा घोटकर यांनी प्रभावी भाषणातून सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या राष्ट्रप्रेम, एकात्मता आणि देशाच्या एकीकरणासाठी दिलेल्या योगदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच बेनोडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार व कर्मचाऱ्यांच्या मोलाच्या सहकार्याने हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

कुंभमेळ्यामुळे ५० हजार कोटींच्या व्यापाराची संधी : एक लाख रोजगारनिर्मितीचा अंदाज

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – गोदावरी नदीच्या तीरावर १२ वर्षांनंतर होणारा नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ धार्मिक सोहळा नसून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला गती देण्याची मोठी संधी आहे, असे मत अखिल भारतीय व्यापारी महासंघाने (कॅट) व्यक्त केले आहे. 'कॅट'चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि स्वदेशी व्यापारी मंचाचे राष्ट्रीय संयोजक बालकृष्ण भरतिया यांनी सांगितले की, कुंभमेळ्यामुळे नाशिक हे देशातील सर्वांत मोठ्या तात्पुरत्या आर्थिक उलाढालीच्या केंद्रांपैकी एक बनेल. 'कॅट'च्या नागपूर विभागाने आयोजित केलेल्या धर्माधारित अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेवर बोलताना भरतिया यांनी या सोहळ्यातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात ५० हजार कोटी रुपयांहून अधिक व्यापाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज व्यक्त केला. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग, आतिथ्य क्षेत्र तसेच वाहतूक सेवांना याचा मोठा लाभ होईल, असे कॅटने म्हटले आहे. कुंभमेळ्यासाठी दोन कोटींहून अधिक भाविक येण्याची अपेक्षा असल्याने हॉटेल व्यावसायिक, रिक्षाचालक, मंडप व्यावसायिक आणि स्टॉलधारकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील. सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता आणि डिजिटल सेवांसारख्या क्षेत्रांत स्थानिक तरुणांसाठी एक लाखांहून अधिक रोजगार उपलब्ध होतील, असा अंदाज भरतिया यांनी व्यक्त केला. कुंभमेळ्याच्या काळात अंथरूण, गाद्या, चादरी आणि उशा यांची मोठ्या प्रमाणावर गरज भासणार आहे.

सरस्वती विद्यानिकेतन खानापूर येथे सुरक्षित बचपन अभियान

बालकांचे संरक्षण ही समाजाची सामूहिक जबाबदारी : विद्यार्थ्यांना गुड टच-बॅड टचबाबत मार्गदर्शन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून तालुका विधी सेवा प्राधिकरण, मोर्शी यांच्या वतीने पीपल्स एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित सरस्वती विद्यानिकेतन, खानापूर येथे सुरक्षित बचपन अभियान राबविण्यात आले. बालकांवरील लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो कायदा २०१२) याबाबत जनजागृती करून विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची आणि सुरक्षिततेची जाणीव करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोर्शी न्यायालयाचे न्यायाधीश रघुवेंद्र देव होते. प्रमुख अतिथी म्हणून सरस्वती विद्यानिकेतनचे मुख्याध्यापक प्रवीण राऊत, मोर्शी न्यायालयातील अधिवक्ता विशाल काळे, अधिवक्ता हर्षदा बाळसराफ तसेच विज्ञान शिक्षक गजानन कडू उपस्थित होते.

अभियानांतर्गत न्यायाधीश रघुवेंद्र देव यांनी विद्यार्थ्यांना बालकांचे अधिकार, वैयक्तिक सुरक्षितता आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे महत्त्व समजावून सांगितले.

प्रत्येक बालकाला सुरक्षित वातावरणात जगण्याचा अधिकार असून, कोणत्याही प्रकारचा अनुचित स्पर्श किंवा गैरवर्तन झाल्यास घाबरून न जाता विश्वासातील सुरक्षित प्रौढ व्यक्तीकडे मदत मागावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना गुड टच आणि बॅड टच याबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात आले.

'आपले अधिकार जाणून घ्या, आवाज उठवा, सुरक्षित राहा', 'विश्वास ठेवा, मदतीसाठी सुरक्षित प्रौढ व्यक्तीकडे जा', 'जागरूक बना, सक्षम बना' आणि 'एकत्र येऊया, बालपण सुरक्षित करूया' अशा घोषवाक्यांच्या माध्यमातून बालसुरक्षेचा संदेश देण्यात आला.

याच कार्यक्रमात न्यायाधीश रघुवेंद्र देव यांच्या हस्ते गुरुकुंज मोझरी येथे आयोजित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन गौरव परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच शाळेत आयोजित श्रीमदभगवद्गीता परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोहन मानकर, अर्चना घोंगडे, श्याम पाचपोर, निलेश वानखडे, अतुल वाकोडे, विनोद कंकाळे, वैभव खाडे, पन्नालाल सूर्यवंशी, कविता पाटील, वैशाली पवार, प्राची राऊत, राधिका भडांगे, विद्यार्थी प्रतिनिधी निलेश हटकर आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी जान्हवी अहिरे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन श्याम पाचपोर यांनी केले.

मोर्शी पोलिसांच्या एकता दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद

एकता दौडमध्ये धावले शेकडो नागरिक | राष्ट्रीय एकता व वाहतूक सुरक्षेचा दिला संदेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून मोर्शी पोलीस स्टेशनच्या वतीने ३१ ऑक्टोबर रोजी 'रन फॉर युनिटी' अर्थात एकता दौडचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थी, नागरिक, विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या दौडीच्या अनुषंगाने पोलिसांनी 'ऑपरेशन कवच' अंतर्गत बॅनर व होर्डिंगच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती केली. मोर्शी पोलीस स्टेशन परिसरातून सुरू झालेल्या या दौडीत ४०० ते ४५० विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले. शिवाजी चौक, सिंभोरा रोडमार्गे मार्गक्रमण करीत ही दौड शहरातील जयस्तंभ चौक येथे पोहोचली.

यावेळी सायबर फसवणुकीपासून सावध राहण्यासोबतच वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन करण्यात आले. 'चला एकतेसाठी धावू या, नशामुक्त जिल्हा घडवू या' हा संदेश देत ठाणेदार राहुल आठवले यांनी वाहनचालकांनी हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करावा, वेगावर नियंत्रण ठेवावे आणि वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळावा, असे आवाहन केले.

या रॅलीत तहसीलदार सागर ढवळे यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे कर्मचारी, भारतीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष आगारकर यांच्या नेतृत्वाखाली १०० विद्यार्थी, शिवाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक अजय धोटे यांच्या नेतृत्वाखाली ४०० विद्यार्थी, मॉर्निंग फिटनेस ग्रुपचे सदस्य, व्यापारी संघटनेचे प्रतिनिधी तसेच पत्रकार बांधव सहभागी झाले होते.ठाणेदार राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, आरसीपी पथक आणि होमगार्ड यांनीही या उपक्रमात सहभाग नोंदविला. राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासोबतच वाहतूक नियम, सायबर सुरक्षेबाबत जागरूकता आणि नशामुक्त समाजाचा संदेश देत या एकता दौडची सांगता मोर्शी पोलीस स्टेशन येथे झाली.

संपादकीय

स्पर्श स्वत:च्या अपयशाशी करावा, दुसऱ्यांच्या यशाशी नाही.

विवाहबंधन की विनाशाचे कारण?

विवाहसंस्था ही दोन कुटुंबांना जोडणारी पवित्र सामाजिक व्यवस्था आहे. मात्र, अलीकडच्या काळात विवाहासारख्या मंगल बंधनाभोवती निर्माण होणारे वाद, अवास्तव अपेक्षा, हुंड्याची मागणी, कौटुंबिक छळ आणि संशयाचे वातावरण पाहता विवाहसंस्थेच्या बदलत्या स्वरूपाबाबत गंभीर चिंतन करण्याची वेळ आली आहे. लग्न म्हणजे दोन जीवांचे मिलन, की आयुष्यभराच्या संघर्षाची सुरुवात, असा प्रश्न समाजासमोर उभा राहत आहे.

भारतीय संस्कृतीत विवाहाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सात जन्मांची साथ देण्याची शपथ घेऊन दोन व्यक्ती नव्या आयुष्याची सुरुवात करतात. मात्र, या नात्याचा पाया प्रेम, विश्वास, समजूतदारपणा आणि परस्पर सन्मानावर उभा राहण्याऐवजी काही ठिकाणी अहंकार, पैशांची अपेक्षा आणि प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांवर उभा राहताना दिसतो. परिणामी, संसार फुलण्याऐवजी अनेक कुटुंबांचे आयुष्य तणावग्रस्त होत आहे.

आज विवाह ठरविताना मुलगा काय कमावतो, मुलीचे कुटुंब किती संपन्न आहे, लग्नात किती खर्च होणार, किती दागिने मिळणार, किती मानपान होणार, याला अवास्तव महत्त्व दिले जाते. मात्र, भावी जोडीदाराचा स्वभाव कसा आहे, त्याचे विचार काय आहेत, तो जबाबदार आहे का, एकमेकांना समजून घेण्याची क्षमता आहे का, याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. विवाह हा प्रतिष्ठेचा सोहळा बनत चालला असून, संसाराच्या खऱ्या जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष होत आहे.

हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, मानसिक छळ, विवाहबाह्य संबंध, संशय आणि मालकी हक्काची भावना या समस्या अनेक संसारांना पोखरत आहेत. काही प्रकरणांमध्ये वैवाहिक वाद इतके विकोपाला जातात की त्यातून आत्महत्येसारख्या दुर्दैवी घटना किंवा गंभीर हिंसक गुन्हे घडतात. अशा घटना केवळ एका व्यक्तीचे आयुष्य उद्ध्वस्त करीत नाहीत, तर दोन कुटुंबांचे भविष्य अंधारात ढकलतात. विशेषत: निष्पाप मुलांच्या मानसिकतेवर त्याचे दूरगामी परिणाम होतात.

वैवाहिक नात्यात मतभेद असणे स्वाभाविक आहे. परंतु मतभेदांचे रूपांतर मनभेदांत आणि मनभेदांचे रूपांतर सूडभावनेत होणे ही चिंतेची बाब आहे. संसारात अडचणी आल्या म्हणून हिंसेचा मार्ग स्वीकारणे किंवा स्वत:चे आयुष्य संपविणे हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही. अशा परिस्थितीत कुटुंबीयांनी, मित्रांनी आणि समाजाने संबंधित व्यक्तींना दोष देण्याऐवजी योग्य वेळी समुपदेशन, मानसिक आधार आणि कायदेशीर मार्गदर्शन उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. याचबरोबर वैवाहिक वादांमध्ये कायद्याचा गैरवापर होऊ नये, तसेच खऱ्या पीडितांना न्याय मिळण्यापासून वंचित ठेवले जाऊ



माणुसकी हरवतेय, स्वार्थ मात्र वाढतोय!



नात्यांमध्ये दुरावा, समाजात संवेदनशीलतेचा अभाव; माणूस माणसापासून दूर जातोय...

आजच्या आधुनिक युगात माणसाने विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि विकासाच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. जग जवळ आले, अंतर कमी झाले, मोबाईलच्या एका क्लिकवर संपूर्ण जगाशी संपर्क साधणे शक्य झाले.

मात्र, या प्रगतीच्या प्रवासात माणूस माणसापासूनच दूर जात असल्याचे विदारक चित्र समाजात दिसू लागले आहे. पूर्वी संकटाच्या काळात धावून जाणारा शेजारी आज साधी विचारपूस करण्यासाठीही वेळ काढत नाही. दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होण्याची भावना कमी होत असून स्वत:चा फायदा, स्वत:ची प्रतिष्ठा आणि स्वत:चे सुख यांनाच अधिक महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे आज एक गंभीर प्रश्न निर्माण होतोय, नेमकी माणुसकी हरवतेय की स्वार्थाने माणसाच्या मनावर कब्जा केलाय?

एकेकाळी गावातील एखाद्या घरात दु:खद घटना घडली की संपूर्ण गाव त्या कुटुंबाच्या मदतीला धावून जायचे. कुणाच्या घरी लग्न असो किंवा संकट, प्रत्येकजण आपलेपणाने सहभागी व्हायचा. सुख-दु:ख सामूहिकपणे वाटून घेण्याची परंपरा होती. शेजारी हा केवळ शेजारी नव्हता, तर कुटुंबातील सदस्यासारखा असायचा. आज मात्र अनेक ठिकाणी शेजाऱ्याच्या घरात काय घडते, याचीही कोणाला माहिती नसते. माणसांमधील संवाद कमी झाला आणि नात्यांमधील जिव्हाळाही हरवत चालला आहे.

समाजात स्वार्थी वृत्ती वाढण्यामागे बदलती जीवनशैली, आर्थिक स्पर्धा, प्रतिष्ठेची चढाओढ आणि भौतिक सुखांच्या मागे लागलेली धावपळ ही काही कारणे असू शकतात. प्रत्येकाला मोठे घर, महागडी गाडी, भरपूर पैसा आणि समाजात प्रतिष्ठा हवी आहे. मात्र, या सगळ्या गोष्टी मिळिवताना माणूस आपली नाती, संस्कार आणि संवेदनशीलता विसरत चालला आहे. दुसऱ्याला मदत केल्याने आपले काय नुकसान होईल, असा विचार आधी केला जातो. मदतीची भावना असण्यापेक्षा त्यातून आपल्याला काय मिळेल, याचा हिशेब मांडला जातो. ही मानसिकता समाजाच्या आरोग्यासाठी चिंताजनक आहे.

आजच्या काळात सोशल मीडियावर माणुसकी, प्रेम, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी याविषयी मोठमोठ्या पोस्ट टाकल्या जातात. वाढदिवसाला शुभेच्छांचा वर्षाव होतो, सणासुदीला संदेशांची देवाणघेवाण होते. मात्र, प्रत्यक्ष आयुष्यात एखाद्या गरजू व्यक्तीला मदतीची आवश्यकता असताना अनेकजण पाठ फिरवतात. मोबाईलवर शेकडो मित्र असतात, पण मनातील दु:ख सांगण्यासाठी विश्वासाने जवळ बसणारा माणूस शोधावा लागतो. आभासी जगातील नाती वाढत असताना प्रत्यक्ष जीवनातील आपुलकी कमी होत असल्याची जाणीव दुर्लक्षित करता येणार नाही.

वृद्ध आई-वडिलांचा प्रश्नही याच माणुसकीच्या अभावाशी जोडलेला आहे. ज्या आई-वडिलांनी आपल्या मुलांच्या भविष्यासाठी आयुष्यभर कष्ट उपसले, त्यांनाच वृद्धापकाळात एकटेपणाचा सामना करावा लागतो, अशा घटना समाजात समोर येतात. काही कुटुंबांमध्ये संपत्ती आणि मालमत्तेच्या वादातून नात्यांमध्ये कटुता निर्माण होते. रक्ताच्या नात्यांमध्येही पैशाला अधिक महत्त्व मिळू लागले, तर संस्कार आणि माणुसकीचा पाया कमकुवत होणारच.

दुसरीकडे, रस्त्यावर अपघात झाल्यानंतर जखमी व्यक्तीला मदत करण्याऐवजी काहीजण मोबाईलमध्ये चित्रण करण्यात व्यस्त असतात, अशा घटना संवेदनशीलतेबाबत प्रश्न निर्माण करतात. एखाद्या गरीब व्यक्तीच्या अडचणीपेक्षा त्याच्या परिस्थितीचा फायदा घेण्याची प्रवृत्तीही चिंतेची आहे. मात्र, या चित्राला दुसरी बाजूही आहे. आजही अनेक अनोळखी व्यक्ती गरजूंना मदत करतात, रक्तदान करतात, सामाजिक उपक्रम राबवतात आणि संकटात सापडलेल्या कुटुंबांना आधार देतात. त्यामुळे समाजातील माणुसकी पूर्णपणे संपलेली नाही; तिला अधिक बळ देण्याची गरज आहे.

विशेषत: तरुण पिढीसमोरही मोठे आव्हान आहे. स्पर्धेच्या युगात यशस्वी होणे महत्त्वाचे आहेच; पण यश मिळिवताना माणूस म्हणून आपली ओळख टिकवणे त्याहून महत्त्वाचे आहे. शिक्षण केवळ पदवी मिळिवण्यासाठी नसून विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी विकसित करण्यासाठीही असते. मुलांना केवळ पैसा कमावण्याचे धडे देण्याऐवजी दुसऱ्याच्या वेदना समजून घेण्याचे संस्कारही घरातून आणि शाळेतून मिळायला हवेत.

समाजात बदल घडविण्यासाठी मोठमोठ्या भाषणांची किंवा घोषणांची आवश्यकता नाही. आपल्या आजूबाजूच्या गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे, वृद्धांची विचारपूस करणे, संकटात सापडलेल्या व्यक्तीला आधार देणे, कुणाचे मन दुखावू नये याची काळजी घेणे, एवढ्या छोट्या कृतीतूनही माणुसकी जिवंत राहू शकते. प्रत्येकाने स्वत:पासून सुरुवात केली, तर समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.

आज पैसा वाढतोय, सुविधा वाढत आहेत, संपर्काची साधने वाढत आहेत; पण मनातील आपुलकी कमी होत असेल तर या प्रगतीचा उपयोग काय? माणसाने किती मोठे घर बांधले यापेक्षा त्या घरात किती प्रेम आहे, किती पैसा कमावला यापेक्षा त्याने किती जणांना मदतीचा हात दिला, याला अधिक महत्त्व असले पाहिजे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, माणूस श्रीमंत पैशाने नव्हे, तर मनाने असला पाहिजे. स्वार्थासाठी माणसे जोडण्यापेक्षा निस्वार्थ भावनेने माणसे जपली पाहिजेत. कारण पैसा संकटात सर्व काही विकत घेऊ शकत नाही आणि प्रतिष्ठा दु:खाच्या वेळी आधार देऊ शकत नाही. अशा वेळी माणसाला माणसाचीच गरज असते. म्हणूनच आज समाजाला केवळ सुशिक्षित, श्रीमंत आणि प्रगत माणसांची नव्हे, तर संवेदनशील, सहृदयी आणि माणुसकी जपणाऱ्या माणसांची गरज आहे. अन्यथा विकासाच्या उंच इमारती उभ्या राहतील; पण त्यामध्ये माणुसकीचा पाया मात्र हरवलेला असेल!

तरुणांच्या हाताला काम नाही : स्थलांतराचे वाढते संकट!



बेरोजगारीच्या विळख्यात तरुणाई; गाव सोडून शहरांकडे धाव, ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर नवे आव्हान!

आजचा तरुण हा देशाचे भविष्य मानला जातो. देशाच्या विकासाची मोठी जबाबदारी तरुण पिढीच्या खांद्यावर आहे. शिक्षण, तंत्रज्ञान, कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर नवे शिखर गाठण्याची क्षमता तरुणांमध्ये आहे. मात्र, या क्षमतेला योग्य संधी मिळत नसेल तर त्या शिक्षणाचा आणि कौशल्याचा उपयोग तरी काय? आज ग्रामीण भागातील अनेक तरुणांच्या हाताला काम नाही. पदवी मिळवूनही नोकरी मिळत नाही, व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल नाही आणि शेतीतून स्थिर उत्पन्न मिळण्याची खात्री नाही. परिणामी, रोजगाराच्या शोधात तरुणांना आपले गाव, घर आणि कुटुंब सोडून शहरांकडे स्थलांतर करावे लागत आहे. ही परिस्थिती केवळ बेरोजगारीची नसून ग्रामीण भागाच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान आहे.

ग्रामीण भागातील बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक महत्त्वाचा ठरत आहे. गावागावांत शिक्षणाच्या सुविधा वाढल्या, महाविद्यालये सुरू झाली, पदवीधरांची संख्या वाढली; परंतु त्या तुलनेत रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अनेक तरुण बारावी, पदवी, पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात. मात्र, मर्यादित जागा, भरती प्रक्रियेतील विलंब आणि वाढती स्पर्धा यामुळे अनेकांच्या पदरी निराशा पडते. शिक्षण पूर्ण करूनही रोजगार मिळत नसल्याने तरुणांमध्ये अस्वस्थता वाढत आहे.

विदर्भातील ग्रामीण भागात शेती हा रोजगाराचा प्रमुख आधार आहे. मात्र, शेतीवर पूर्णपणे अवलंबून राहणे अनेक कुटुंबांसाठी कठीण झाले आहे. अवकाळी पाऊस, अनियमित हवामान, उत्पादन खर्चातील वाढ, शेतमालाच्या भावातील चढ-उतार आणि नैसर्गिक संकटे यामुळे शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाची शाश्वती राहिलेली नाही. त्यामुळे शेतकरी कुटुंबातील तरुण शेतीसोबतच अन्य रोजगाराच्या संधी शोधत आहेत. गावात उद्योगधंदे, प्रक्रिया उद्योग आणि स्थानिक रोजगार उपलब्ध नसल्याने त्यांना पुणे, मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर तसेच इतर औद्योगिक शहरांचा मार्ग धरावा लागत आहे.

स्थलांतर हा केवळ रोजगार मिळिवण्याचा पर्याय नसून त्यामागे अनेक सामाजिक समस्या दडलेल्या आहेत. गावातील तरुण कामासाठी बाहेर गेल्यानंतर कुटुंबापासून दूर राहतो. आई-वडील, पत्नी, मुले आणि कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींना त्याची उणीव जाणवते. अनेकदा शहरांमध्ये भाड्याचे घर, महागाई, प्रवासाचा खर्च आणि अस्थिर रोजगार यांचा सामना करावा लागतो. रोजंदारीवर काम करणाऱ्या तरुणांना काम मिळेल की नाही, याचीही खात्री नसते. काहींना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी दर्जाचे काम स्वीकारावे लागते. अशा परिस्थितीत शिक्षण घेऊनही अपेक्षित जीवनमान मिळत नसल्याची भावना निर्माण होते.

याहून चिंताजनक बाब म्हणजे गावातील तरुणांची संख्या कमी होत असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही परिणाम होत आहे. गावातील शेतीकामे, छोटे व्यवसाय, सामाजिक उपक्रम आणि स्थानिक बाजारपेठ यांना तरुणांच्या सहभागाची गरज असते. परंतु रोजगाराच्या शोधात तरुण बाहेर गेल्याने अनेक गावांमध्ये स्थानिक पातळीवर मनुष्यबळाची कमतरता जाणवू लागते. गावातील शिक्षित आणि कुशल तरुण शहरांकडे जात असतील, तर ग्रामीण विकासाची गती कशी वाढणार? हा प्रश्न प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

सरकारकडून रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. मात्र, या योजनांची माहिती प्रत्यक्ष गरजू तरुणांपर्यंत पोहोचते का? कर्ज मिळिवण्याची प्रक्रिया सुलभ आहे का? प्रशिक्षणानंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. केवळ प्रशिक्षण प्रमाणपत्र देऊन बेरोजगारीचा प्रश्न सुटणार नाही. प्रशिक्षणानंतर प्रत्यक्ष रोजगार किंवा व्यवसाय उभारण्यासाठी आर्थिक आणि तांत्रिक मदत मिळणे गरजेचे आहे.

विशेषत: वरूड आणि मोर्शी तालुक्यासारख्या ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीच्या संधी वाढविण्याची मोठी गरज आहे. संत्रा उत्पादक पट्टा म्हणून ओळख असलेल्या या भागात संत्रा प्रक्रिया उद्योग, फळ साठवणूक केंद्रे, पॅकिंग उद्योग, शीतगृहे आणि कृषीपूरक व्यवसायांना चालना दिल्यास स्थानिक तरुणांना रोजगार मिळू शकतो. महिला बचतगट, लघुउद्योग, दुग्धव्यवसाय, अन्नप्रक्रिया आणि ग्रामीण पर्यटन यांसारख्या क्षेत्रांतही रोजगाराच्या संधी निर्माण करता येऊ शकतात. यासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था आणि उद्योजकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांनीही या प्रश्नाकडे केवळ विकासकामांच्या चौकटीतून न पाहता रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. ग्रामपंचायत स्तरावर बेरोजगार तरुणांची कौशल्ये आणि उपलब्ध मनुष्यबळ यांची माहिती संकलित करून स्थानिक रोजगाराच्या संधी शोधता येतील. रोजगार मेळावे, मार्गदर्शन शिबिरे आणि स्वयंरोजगार प्रशिक्षण आयोजित करता येईल. तसेच रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात टिकाऊ मालमत्ता निर्माण करून शेती आणि पाणलोट विकासाला हातभार लावता येईल. तरुणांनीही केवळ सरकारी नोकरीवर अवलंबून न राहता उपलब्ध कौशल्ये, आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वयंरोजगाराच्या संधींचा विचार करणे आवश्यक आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

WARUD URBAN CO-OPERATIVE BANK LTD. WARUD REG. NO. 576

BALANCE SHEET AS ON 31.03.2026

(Amount in Rupees)

31.03.2025	LIABILITIES	AMOUNT	31.03.2026	31.03.2025	ASSETS	AMOUNT	31.03.2026
1,00,00,000 00	AUTHORISED SHARE CAPITAL		1,00,00,000 00	28,58,296=00	A) CASH IN HAND		24,72,059=00
91,98,265=00	A) PAID-UP SHARE CAPITAL		9057115=00	2,20,89,001=18	B) BANK BALANCE CD. A/C		1,71,41,849=39
72,48,735=66	B) FUNDS :-		80,03,513=43		1) M.S. Co op Bank Mumbai	94,760=61	
	1) Reserve fund	47,85,041 48			2) M.S.Co-op Bank Nagpur	3,681=77	
	2) Building fund	20,37,191=18			3) M.S.Co-op Bank Amt.	9,91,885 19	
	3) Investment fluctuation fund	83,689=00			4) ADCC Bank Warud	1,79,701=97	
	4) Staff Welfare fund	10,84,473=77			5) State Bank of India Warud	10,75,755=41	
	5) Member welfare fund	15,118=00			6) IDBI Bank Nagpur	22,684=70	
		80,03,513=43			7) IDBI Bank Warud	20,31,669=98	
9,44,12,942=42					8) Union Bank of India Warud	11,27,728 59	
	C) DEPOSITS		9,88,22,817=04		9) Central Bank of India C/A	16,00,166=97	
	1) Current Deposit	21,43,640=16			10) HDFC Bank Nagpur	25,93,123 67	
	2) Saving Deposit	177,45,139=88			11) Indian Overi Bank	1,40,738=41	
	3) Fixed Deposit	6,17,77,280=00			12) KUC Bank (C/A)	42,79,951=22	
	4) Reinvestment Deposit	1,56,765 00				1,71,41,849=39	
	5) Locker FD	5,71,631=00		4,04,96,649=48	C) INVESTMENT		3,68,29,616=48
	6) Monthly intt Deposit	1,30,00,000=00			1) M.S. Co-op. Bank Share	1,000=00	
	7) Suvana Kanya Thev	1,95,393=00			2) ADCC Bank Share	1,000=00	
	8) Recurring Deposit	11,06,155=00			3) Govt Securities	2,54,44,575=00	
	9) Pigmy Deposit	23,19,706 00			4) See Deposit M.S.Co-op Bak	1,00,000 00	
		9,88,22,817=04			5) ADCC Bank (Res Fund)	17,82,041=48	
	D) INTT. PAYABLE.				6) M.S.Co-op Bank Amt FD	25,00,000 00	
10,71,850=00	.				7) IDBI Bank Warud	20,00,000=00	
	Intt.Payable on fixed deposit	8,55,144=00	8,55,144=00		8) Union Bank of India FD	20,00,000=00	
		8,55,144=00				3,68,29,616=48	
					D) LOAN AND ADVANCES		
				5,03,24,433=79	1) Individual loan	33,26,408=10	6,39,17,313=75
					2) Salary Earners Loan	3,41,299 =00	
					3) Real estate Loan	77,47,075=16	
	E) OTHER LIABILITIES		2,71,821=35		4) Agriculture Loan	16,85,092 59	
2,94,444=35	1) Entrance Fee	27550=00			5) Cash-Credit Loan	1,21,590=00	
	2) DEAF Fund Pay	1,61,776 90			6) Secured Cash-Credit	35,59,571 90	
	3) Sundry Creditors	81,094=45			7) Vehicle Loan	16,32,274=00	
	4) TDS Payable	0=00			8) CCD	10,29,392=00	
	6) Shere Suspen	1,400=00			9)Loan Agst. Deposits	21,88,369=00	
		2,71,821=35			10) Housing Loan	1,62,19,630=25	
	F) Provisions		1,06,250=00		11) Gold Loan	2,60,65,611 00	
1,06,250=00	1) Standard Assets	1,06,250=00				6,39,17,313=75	
		1,06,250=00		4,16,857=00	E) FIx ASSETS		5,38,297=00
					1)Furniture & Fixture	88,822=00	
					2) Stationary in Hand	77,718 00	
	1) Bad & Doubtful fund	54,64,605=50	57,93,761=50		3) Computer & Machinery	2,81,315=00	
61,93,761=50	2) Prov. For Spl debts	3,29,156=00			4) Dead Stock	90,744 00	
		57,93,761=50				5,38,297=00	
00=00	OBC for Collection			10,96,084=90	F1) OTHER ASSETS		15,58,395=67
					1) Telephone Deposit	11,995=00	
					2) Festival advance to staff.	33,000 00	
					3) Legal Charges Receivable	1,95,196=00	
00=00	ADCC Bank OD	00=00			4) Sundry Debitors	6500=00	
					5) Lic of India	10,84,473=77	
					6) G-Sec Priminm	65,454=00	
	Intt Receivable		1,40,29,945=00		7) DEAF Fund Pay	161776 90	
1,70,25,102=00	on Loan	1,40,29,945=00				15,58,395=67	
					G) INTT. RECEIVABLE		1,50,24,162=57
				1,82,70,370=00	1) Intt Rec. on Invest	9,89,605=00	
					2) Intt Rec. on Loan	1,40,34,557=57	
						1,50,24,162=57	
					G) BILLS RECEIVABLE		00=00
				00=00	1) Outward B. Rre-vable OB	00.00	0.00
0.00	Excess Profit 2026		541327=54	0.00			
135551692.35	Total Liabilities of Bank	137481669.86	137481669.86	135551692.35	Total Liabilities of Bank	137181669.86	137481669.86
				15,53,420=75			
15,28,420=75	H) Contingent Liability of the	15,28,420=75	15,28,420=75		1)Amount Reserve for Borr. Contra Entries	15,28,420=75	15,28,420=75
13,70,80,113.10			13,90,10,115.61	13,70,80,113.10			13,90,10,115.61

Date :- 09.04.2026 Manager CEO Chairman

WARUD URBAN CO-OPERATIVE BANK LTD. WARUD REG. NO. 576

PROFIT AND LOSS AS ON 31.03.2026

31.03.2025	EXPENDITURE	AMOUNT	31.03.2026	31.03.2025	INCOME	AMOUNT	31.03.2026
41,07,474=00	B) INTEREST PAID ON DEPOSITS :		47,86,735=00	86,06,917=78	A) INTEREST RECEIVED :		82,69,317=21
	01) Intt. Paid on saving deposit	3,42,742=00			1) Intt Recd. on Advances	63,82,468=38	
	02) Intt. Paid on small saving	33,265=00			2) Intt Recd on Govt Security	16,64,861=83	
	03) Intt. Paid on fixed deposit	32,18,508=00			3) Intt. Recd on Investment	2,21,987 00	
	04) Intt. Paid on monthly int	10,00,786 00				82,69,317=21	
	05) Intt. Paid on quarterly int	147=00					
	06) Intt. Paid on reinvestment	10,748=00					
	07) Intt. Paid on locker deposit	20,824=00					
	08) Intt. Paid on RD Deposit	1,29,715=00					
		47,86,735=00		3,79,857=10	B) OTHER INCOME. :		4,86,187=95
6065.45	Intt Paid on Borrowing	0=00	0=00		1) Incidental charges	1,00,104 00	
					2) Commission Exchange	21,179=00	
	C) OPERATING EXPENCES :		11,60,072=00		3) Locker Rent	29,900=00	
11,85,632=00	A) Staff Expenses				4) Process Fee	1,11,300=00	
	1) Salary	10,93,798=00			5) loan Recover Charge	2,23,604=95	
	2) Honorarium Paid	66,274=00			6) Miscellaneous	1 00=00	
		11,60,072=00				4,86,187=95	
1,15,529=00	3) Banks PF Contribution	1,20,915=00	1,20,915=00	00=00			00=00
76863=00	B) Directors Fees				C) LOSS :	00=00	
	1) T.A To Directors	46,200=00	1,35,130=00				
	2) Meeting Expenditure	88,930=00					
		1,35,130=00					
6,04,316=00	D) Other Expenses		6,05,846=13				
	1) Rent,	3,64,370=00					
	2) Professional Tax	00=00					
	3) Insurance,	1,87,706=13					
	4) Lighting	53,820=00					
		6,05,846=13					
29,499=00	1) Postage	1735=00	29,561=00				
	2) Telephone	27,826=00					
	3) Fax	00=00					
		29,561=00					
35,793=00	Stationery Printing and Advertisement		19,656=00				
	1) Stationery	8,544=00					
	2) Advertisement	11,112 00					
		19,656=00					
1,29,866=00	1) Audit Expenses	1,32,810=00	1,32,810=00				
1,39,930=00	Depreciation & repairs of Bank Property						
	1) Depreciation	1,56,430 00	1,89,910=00				
	2) Repairs & Maintenance	33,480=00					
		1,89,910=00					
5,24,807=17	Other Expenses		5,49,542=49				
	1) National Pro. Expenditure	4,500=00					
	2) A.M.C.	74,607 00					
	3) Xerox &Typing	2,006=00					
	4) Contingencies	99,171 00					
	5) RBI Penalty	00=00					
	6) Pigmy Agent Commission	1,68,100=00					
	7) Other Bank Charges	9,362=49					
	8) Stamp Duty	4,880=00					
	9) Loan Recovery Charges	0 00					
	10) TA to Staff	21,191=00					
	11) Annual Gc. Meeting	1,53,036=00					
	12)Fees Txe	8,080=00					
	13) Tanning Exp	4606=00					
		5,49,542=49					
00=00							
	D) PROVISION :						
	1) Audit Fees	00=00					
	2) Bonus	0=00					
			4,84,000=00				
2,50,000=00	Income Tax (2025-2026)	4,84,000=00	5,41,327=54				
17,51,000=26	F) PROFIT :	5,41,327=54					
89,86,774.88			87,55,505.16	89,86,774.88			87,55,505.16

Date :- 09.04.2026 MANAGER. C.E.O. CHAIRMAN.

न्यायालये बॉम्बने उडवण्याची धमकी : ठाणे, सांगली, परभणी, हिंगोली, बीड, सोलापूर न्यायालयात आले ई-मेल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोलीसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील न्यायालयांना बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ई-मेल आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकारामुळे पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून अधिक तपास सुरू आहे. सायबर पोलिसांकडूनही ई-मेल पाठवणाऱ्या आरोपीचा कसून शोध घेतला जात आहे. ठाणे जिल्हा न्यायालयात आयईडी बॉम्बस्फोट घडविण्याच्या धमकीचा ई-मेल सोमवारी प्राप्त झाली. त्यानुसार, २७ नोव्हेंबरपर्यंत ठाणे जिल्हा न्यायालयात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली आहे. सन १९८४ मधील रक्तपाताचा बदला



रक्ताने घेण्याचा उल्लेख या ई-मेलमध्ये केला आहे. आपण दिलजीत दोसांझ याचा साथीदार असल्याचा उल्लेख करत, २७ नोव्हेंबर रोजी महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या कार्यक्रमात आयफोनमध्ये आयईडी ठेवून बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी आरोपीने दिली आहे.

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१०१२/२०२६ ने.ता.१६/१२/२०२६

अर्जदार :-

गजानन पुंडलिकराव हरले

वय अं.५८ वर्ष, धंदा-मजुरी

रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत अहील्याबाई पुंडलिकराव हरले, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्मची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२३३/२०२६ ने.ता.११/१२/२०२६

अर्जदार :- अमीत विनोदराव गुल्हाणे

वय अं.३१ वर्ष, धंदा-मजुरी

रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.सचिव साहेब

ग्रामपंचायत कार्यालय लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदाराची आई **नामे रत्नप्रभा परसराम गुल्हाणे यांचा जन्म दि.०५/०७/१९६० रोजी लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास अर्जदाराची आई **नामे रत्नप्रभा परसराम गुल्हाणे यांचा जन्म दि.०५/०७/१९६० रोजी लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.११/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (२) अन्वये जन्मची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२३४/२०२६ ने.ता.०१/१२/२०२६

अर्जदार :- गंगाधर पांडुरंग उतखेडे

वय अं.५३ वर्ष, धंदा-मजुरी

रा.हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.सचिव साहेब

ग्रामपंचायत कार्यालय हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदाराचे **नामे गंगाधर पांडुरंग उतखेडे यांचा जन्म दि.१५/११/१९६७ रोजी हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास अर्जदाराची **नामे गंगाधर पांडुरंग उतखेडे यांचा जन्म दि.१५/११/१९६७ रोजी हातुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०१/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (२) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२९९/२०२६ ने.ता.२४/१२/२०२६

अर्जदार :- शबानाबी अमान शहा

तर्फे बब्बु शहा अमान शहा

वय अं.४६ वर्ष, धंदा-मजुरी

रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.सचिव साहेब

ग्रामपंचायत कार्यालय आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार नामे **शबानाबी अमान शहा हिचा जन्म दि.१०/१२/१९८१ रोजी आमनेर ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **शबानाबी अमान शहा हिचा जन्म दि.१०/१२/१९८१ रोजी आमनेर ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

टाटा ट्रस्टमधील वाद : मतभेद सामोपचाराने मिटवावेत, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – टाटा सन्स आणि त्यांचे सर्वांत मोठे भागधारक टाटा ट्रस्ट यांच्यात सुरू असलेले मतभेद लवकरात



लवकर सामोपचाराने सोडवले जावेत, असे मत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी व्यक्त केले.

प्रदीर्घ गुंतवणूकदारांकडून सुरू असलेली भांडवलाची माघार आणि करकपातीच्या वाढत्या मागणीसंदर्भात सीतारामन यांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. मात्र, या संदर्भात व्यक्त होणाऱ्या तीव्र चिंतांची सरकार दखल घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. टाटा समूहातील वादाचा उल्लेख करताना त्यांनी हा मुद्दा भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. तसेच, हा वाद सार्वजनिक व्यासपीठावर येणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. दरम्यान, दोन्ही बाजूंना चर्चेसाठी एकत्र आणण्याचा सरकार प्रयत्न करणार का, यावर भाष्य करण्यास त्यांनी नकार दिला. हा विषय संवेदनशील असल्याचे त्यांनी नमूद केले. सीतारामन म्हणाल्या, भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे संबंधितांनी आपापसांत सामोपचाराने हा प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (२) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३००/२०२६ ने.ता.२४/१२/२०२६

अर्जदार :- बब्बु शहा अमान शहा
वय अं.४६ वर्ष, धंदा-मजुरी
रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.सचिव साहेब
ग्रामपंचायत कार्यालय आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार नामे **बब्बु शहा अमान शहा यांचा जन्म दि.१०/०४/१९८१ रोजी आमनेर ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **बब्बु शहा अमान शहा यांचा जन्म दि.१०/०४/१९८१ रोजी आमनेर ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (२) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३०२/२०२६ ने.ता.२३/१२/२०२६

अर्जदार :- सौ.मंगला प्रमोद गलबले
वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.सचिव साहेब
ग्रामपंचायत कार्यालय काचुर्णा, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार नामे **विद्या सुधाकर विरखरे यांचा मृत्यु दि.३०/०३/२०१० रोजी काचुर्णा, ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **विद्या सुधाकर विरखरे यांचा मृत्यु दि.३०/०३/२०१० रोजी काचुर्णा, ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (२) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२९८/२०२६ ने.ता.२३/१२/२०२६

अर्जदार :- अब्दुल मजीद शेख बुद्दु कुरेशी
तर्फे मोहम्मद इमरान अब्दुल मजीद कुरेशी
वय अं.३३ वर्ष, धंदा-वकीली
रा.आमनरे, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.सचिव साहेब
ग्रामपंचायत कार्यालय आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार नामे **अब्दुल मजीद शेख बुद्दु कुरेशी यांचा जन्म दि.०५/०८/१९५६ रोजी आमनेर, ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **अर्जदाराचे वडील नामे अब्दुल मजीद शेख बुद्दु कुरेशी यांचा जन्म दि.०८/०८/१९५६ रोजी आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (२) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३०१/२०२६ ने.ता.२४/१२/२०२६

अर्जदार :- मुकीम अहेमद खान रहीम खान
वय अं.४५ वर्ष, धंदा-मजुरी
रा.वार्ड क्र.१५ जैतुनीया मस्जिद समोर, ईस्लाम नगर, वरुड, ता.वरुड

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.मुख्याधिकारी साहेब
नगर परीषद कार्यालय वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार नामे **मुकीम अहेमद खान रहीम खान याचा जन्म दि.३१/०७/१९८१ रोजी वरुड, ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **अर्जदार नामे मुकीम अहेमद खान रहीम खान याचा जन्म दि.३१/०७/१९८१ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

मक्याचे उत्पादन वाढवण्याची नितांत गरज : आयसीएआर महासंचालकांचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – मक्याचे उत्पादन सध्याच्या ५५ दशलक्ष टनांवरून वाढवून पुढील दशकात ७५ दशलक्ष टनांपर्यंत नेण्याचे आवाहन भारतीय कृषी संशोधन परिषदेचे



(आयसीएआर) महासंचालक एम. एल. जाट यांनी केले. हैदराबाद येथे परिषदेला संबोधित करताना त्यांनी भारताचे मका उत्पादन ५५ दशलक्ष टनांवर पोहोचल्याबद्दल आणि गेल्या दशकात उत्पादकतेत झालेली भरीव वाढ याबद्दल मका संशोधन समुदायाचे अभिनंदन केले.

महासंचालक म्हणाले की, तांत्रिक नवकल्पना, सुधारित पीक व्यवस्थापन आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर याद्वारे पुढील दशकात उत्पादन ७५ दशलक्ष टनांपर्यंत वाढवावे आणि उत्पादकतेत दीडपट वाढ करावी. पारंपारिक ४एफ व्हिजनचा (अन्न, पशुआहार, चारा आणि इंधन) विस्तार करून शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून ५एफ व्हिजन राबवण्यावर त्यांनी भर दिला. संशोधन आणि कृषी विस्तारामुळे शेतकऱ्यांचा नफा आणि जीवनमान उंचावले पाहिजे, यावर त्यांनी जोर दिला. इतर महत्त्वाच्या पिकांची, तेलबिया आणि डाळींची हानी न करता, मक्याच्या उत्पादनातील तफावत भरून काढण्यासाठी 'सिस्टम-सायन्स' दृष्टिकोन स्वीकारण्याचे त्यांनी सुचवले. बियाणे प्रणालीच्या माध्यमातून परवडणाऱ्या आणि दर्जेदार बियाण्यांची – विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील संकरित बियाण्यांची गरज त्यांनी अधोरेखित केली.

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९७९/२०२६ ने.ता.१७/१२/२०२६

अर्जदार :-
१) विलास जनार्दन सहारे, वय अं.४९ वर्ष, धंदा-मजुरी
रा.घोराड, ता.वरुड, जि.अमरावती
२) ज्योती सुभाष राऊत,, वय अं.७४ वर्ष, धंदा-घरकाम
३) शोभा भोजराज राऊत, वय अं.४१ वर्ष, धंदा-घरकाम
क्र.२ व ३ रा.कोहळा, पो.ढवळापुर, ता.काटोल, जि.नागपूर

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत जनार्दन गोविंद सहारे व मयत शेवंताबाई जनार्दन सहारे, रा.घोराड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०९/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९८८/२०२६ ने.ता.१७/१२/२०२६

अर्जदार :-
१) पदमा जानराव बागडे, वय अं.४८ वर्ष, धंदा-घरकाम
२) अंशुल जानराव बागडे, वय अं.२४ वर्ष, धंदा-मजुरी
दोघेही रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत जानराव तुकाराम बागडे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९८५/२०२६ ने.ता.०७/१२/२०२६

अर्जदार :-
१) पंचफुला भिमराव पोजगे, वय अं.७२ वर्ष, धंदा-घरकाम
२) विशाल भिमराव पोजगे, वय अं.४५ वर्ष, धंदा-नोकरी
३) मयुर भिमराव पोजगे, वय अं.४० वर्ष, धंदा-शेती
सर्व रा.आमला विश्वेश्वर, ता.चांदुररेल्वे, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत किसन नागो पोजगे व मयत कमला किसरनराव पोजगे, रा.लोणी ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/१२/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (२) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२९७/२०२६ ने.ता.१९/१२/२०२६

अर्जदार :- श्रावणी मंगेश मरस्कोल्हे
वय अं.१८ वर्ष, धंदा-शिक्षण
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.मुख्याधिकारी साहेब
नगर परीषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार स्वत: नामे **श्रावणी मंगेश मरस्कोल्हे हिचा जन्म दि.०१/०८/२००८ रोजी वरुड, ता.वरुड जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **श्रावणी मंगेश मरस्कोल्हे हिचा जन्म दि.०१/०८/२००८ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड



जंगलतोडी विरोधात कर्जतमध्ये कडकडीत बंद : सह्याद्री बचाव आंदोलनाची सयाजी शिंदेंची घोषणा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



कर्जत/नागपूर – कर्जत तालुक्यातील टोरंट वीज प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सोमवारी पुकारलेल्या 'कर्जत बंद'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, तर दुसरीकडे, 'जंगले कापून होणारा विकास खोटा आहे, आता तरी जागे व्हा आणि झाडखाऊ व्हायरसला पळवून लावा', असे आवाहन करीत सह्याद्री फाऊंडेशनचे प्रमुख आणि अभिनेते सयाजी शिंदे यांनी सोमवारी नागपुरात 'सह्याद्री बचाव' आंदोलनाची घोषणा केली.

नागपुरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत अभिनेते शिंदे म्हणाले, की विकासाच्या नावाखाली जंगले आणि निसर्गसंपत्ती नष्ट केली जात आहे. झाडाझुडपांसकट सगळी जंगले विकायला काढली आहेत. सह्याद्री पर्वतरांगांचे अस्तित्व धोक्यात आले असून आता ते वाचवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठीच 'सह्याद्री बचाव' आंदोलन सुरू करण्यात येत आहे.

अर्जुना ॲग्रोच्या दिवाळी फराळाची सातासमुद्रापार भरारी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

पहिली शिपमेंट दक्षिण कोरियात तर दुसरी थेट अमेरिकेत



वरुड – ग्रामीण महिलांच्या कष्टांना जागतिक ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने सुरु झालेल्या अर्जुना ॲग्रोच्या दिवाळी फराळ उपक्रमाने आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी झेप घेतली आहे. महाराष्ट्राच्या पारंपरिक दिवाळी फराळाची चव आता सातासमुद्रापार पोहोचली असून, अर्जुना ऍग्रोची पहिली शिपमेंट दक्षिण कोरिया येथे तर दुसरी शिपमेंट थेट अमेरिका येथे रवाना झाली आहे. या यशामुळे वरुडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अर्जुना ॲग्रोचे संचालक अजिंक्य खेरडे यांच्या पुढाकारातून ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी यंदा विशेष दिवाळी फराळ उपक्रम राबविण्यात आला. दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या ग्रामीण महिलांच्या हाताला काम मिळावे, त्यांच्या कौशल्याला योग्य मोबदला मिळावा आणि त्यांच्या कुटुंबातही दिवाळीचा आनंद फुलावा, या सामाजिक भावनेतून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत ग्रामीण महिलांच्या कुशल हातांनी पारंपरिक पद्धतीने तयार केलेल्या चिवडा, चकली, करंजी, शंकरपाळे, शेव, अनारसे अशा विविध स्वादिष्ट फराळाच्या पदार्थांना ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे, या फराळाची मागणी आता देशाच्या सीमा ओलांडून परदेशातूनही होत आहे. वरुड येथील रुपराव वरुडकर यांनी आपल्या मुलासाठी दक्षिण कोरिया येथे तर डॉ.अभय खेरडे यांनी आपल्या मुलीसाठी अमेरिकेत पाठविलेल्या या दोन शिपमेंटमुळे अर्जुना ॲग्रोच्या उपक्रमाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या पारंपरिक खाद्यपदार्थांनाही जागतिक बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते, हे या यशातून अधोरेखित झाले आहे. या दोन्ही शिपमेंट वरुड पोस्ट विभागामार्फत पाठविण्यात आल्या. यावेळी वरुड पोस्ट ऑफिसचे मुख्य अधिकारी हेमंत शिंगरवाडे, अनिरुद्ध वानखडे आणि प्रवीण वाडिजे यांनी विशेष परिश्रम घेतले. स्थानिक उत्पादन, ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण आणि जागतिक बाजारपेठ या त्रिसूत्रीवर अर्जुना ऍग्रो कार्यरत आहे. ग्राहकांनी अर्जुना ऍग्रोचा दिवाळी फराळ खरेदी करण्यासाठी शेती योध्दा, अमृतपेठ आणि गावाकडचं.कॉम या माध्यमांतून ऑर्डर देऊन ग्रामीण महिलांच्या रोजगारनिर्मितीला हातभार लावावा, असे आवाहन संचालक अजिंक्य खेरडे यांनी केले आहे. ग्रामीण महिलांच्या हाताला रोजगार, त्यांच्या कौशल्याला योग्य मोबदला आणि त्यांच्या कष्टांना जागतिक बाजारपेठ मिळवून देणारा अर्जुना ॲग्रोचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरत असून वरुडच्या ग्रामीण उद्योजकतेची यशोगाथा जगभर पोहोचवत आहे.

रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुराचा मृत्यू : नया वाठोडा परिसरात हळहळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मोर्शी – रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामावर मजूर म्हणून कार्यरत असलेल्या नया वाठोडा येथील रमेश वाघाडे (वय ६०) यांचा मृत्यू झाल्याची दर्देवी घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, मजूर वर्गातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रमेश वाघाडे हे भूमिहीन असून, गेल्या पाच महिन्यांपासून ई-क्लास वृक्षलागवडीच्या जमिनीवर रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूर म्हणून काम करीत होते. कामावर असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती रोजगार सेवकाने दुपारी अडीच वाजताच्या सुमारास शिरखेड पोलीस ठाण्याचे बीट जमादार मनोहरे यांना दिली.

रमेश वाघाडे यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या कर्त्या व्यक्तीच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मृत मजुराच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत व नियमानुसार लाभ मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हिवरखेड येथे कारच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अपघातानंतर चालक फरार



मोर्शी – तालुक्यातील हिवरखेड येथे भरधाव कारच्या धडकेत ६० वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली. बाबारावजी विठोबाजी पोटपीठे (वय ६०) असे मृताचे नाव आहे. अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून निघून गेल्याने मोर्शी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास तक्रारदार लोकेश बाबारावजी पोटपीठे (वय २६) यांना त्यांच्या आईचा फोन आला. वडिलांना हिवरखेड येथील सावजी बारसमोर एका कारने धडक दिल्याची माहिती त्यांनी दिली. या अपघातात बाबारावजी पोटपीठे रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले होते.

घटनेची माहिती मिळताच लोकेश यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी वडिलांना तातडीने मोर्शी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. अपघातात सहभागी असलेली पांढऱ्या रंगाची टाटा पंच कार (क्रमांक MH-२७ EC ६४०३) धडकेनंतर घटनास्थळावरून निघून गेल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी मोर्शी पोलीस ठाण्यात मोटार वाहन अधिनियम कलम १८७, भारतीय न्याय संहिता कलम १०६ आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २८१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मोनाली श्रीराम खोडके करीत आहेत.

अखेर वर्षभरापासून बंद असलेला पथदिवे सुरु

नगरपरिषदेने घेतली तात्काळ दखल : दोन दिवसांत अंधार दूर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – शहरातील आनंद नगर परिसरातील मालवीय गार्डनजवळ, नमो उद्यानाच्या डाव्या बाजूला साबू लॉन ते सिंभोरा रोडला जोडणाऱ्या रस्त्यावरील प्रकाश दंडाळे यांच्या घराजवळील विद्युत खांबावरील पथदिवा गेल्या एक वर्षापासून बंद होता. अखेर नगरपरिषदेने या समस्येची तातडीने दखल घेत अवघ्या दोन दिवसांत पथदिवा सुरू केल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

संबंधित विद्युत खांबाला लागून असलेल्या बाभळीच्या झाडाच्या काटेरी फांद्यांनी खांबाला पूर्णपणे विळखा घातला होता. या रस्त्यावर सकाळपासून संध्याकाळपर्यंत नागरिकांची सतत वदर्ळ असते. मात्र, पथदिवा बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी या परिसरात अंधाराचे साम्राज्य होते. वर्षभरापासून ही समस्या कायम असतानाही त्याकडे लक्ष दिले जात नव्हते. या समस्येची दखल घेत परिसरातील रहिवासी राजेंद्र देशमुख आणि प्रकाश दंडाळे यांनी मोर्शी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष प्रतिक्षा गुल्हाने, उपाध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे आणि मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली. बाभळीच्या झाडाच्या फांद्या छाटून बंद असलेला पथदिवा तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी केली होती. नगरपरिषद प्रशासनाने निवेदनाची त्वरित दखल घेत संबंधित कर्मचाऱ्यांना बाभळीच्या फांद्या छाटून पथदिवा सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

नागरिकांच्या समस्येला तत्परतेने प्रतिसाद देऊन पथदिवा सुरू केल्याबद्दल नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच विद्युत विभागाच्या प्रमुखांचे राजेंद्र देशमुख आणि प्रकाश दंडाळे यांनी आनंद नगर परिसरातील नागरिकांच्या वतीने आभार मानले.



